

*Anand Charitable Sanstha, Ashti's*

# Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya,

**(Arts, Commerce and Science)**

*Kada, Tal. Ashti. Dist. Beed 414 202 (Maharashtra)*

# Criteria V

## 5.3.1 Sports News Paper Cutting


**Phone**
+02441-2396210
+91 9421404246

**Contact**
admkada@gmail.com
www.admkada.com

**Address**
Anandrao Dhonde Alias Babaji
Mahavidyalaya Kada, Taq-Ashti,
District-Beed 414 202 (M.S.)


Made with PosterMyWall.com





Anand Charitable Sanstha Ashti's

# ANANDRAO DHONDE ALIAS BABAJI MAHAVIDYALAYA

Tal. Ashti, Dist. Beed (M.S.)-414 202

# Sports News Paper Cutting

## DEPARTMENT OF PHYSICAL EDUCATION & SPORTS








# Sports News Paper Cutting

## Academic Year: 2017-2018

झुंजार नेता
www.zunjarneta.com
शुक्रवार दि.१ सप्टेंबर २०१७ R.N.I.NO.16856 /68, Postal No - L-Beed/20/201

### धोंडे महाविद्यालयात क्रीडा दिन साजरा

कडा, दि.३१ (प्रतिनिधी):- हॉकीचे जादूगार समजले जाणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयामध्ये क्रीडा दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हरिदास विधाते होते. शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.डॉ. बाळासाहेब धोंडे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या कार्याविषयी व खेळाविषयी माहिती दिली. अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांनी सांगितले की, खेळाला अनन्य साधारण महत्व आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासा बरोबर खेळाकडेही लक्ष द्यावे. आपल्या आवडीच्या खेळाचा नियमित सराव केल्यास विद्यार्थी खेळात देखील यशस्वी होऊ शकतात. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांकडे राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध खेळाचे प्रमाणपत्र असल्यास त्यांना नौकरी सहज उपलब्ध होऊ शकते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. भगवान वाघुले, प्रा.डॉ.भाऊसाहेब काळे, प्रा.डॉ.सांडू भगत, प्रा.डॉ.मुश्ताक पानसरे, प्रा.राम बोडखे व इतरांची भाषणे झाली. कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

Sports Day Celebration in Dhonde College

### कबड्डी स्पर्धेत कड्याचा संघ विद्यापीठात प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

कडा : आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयातील कबड्डी संघ औरंगाबाद येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

औरंगाबाद येथे दगडोजी देशमुख महाविद्यालय वाळूज येथे १६ ऑक्टोबर रोजी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेत येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयातील संघाने सहभाग घेत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवला. हा संघ इंटर झोन स्पर्धेत विद्यापीठाचे नेतृत्व करणार असून, कबड्डी संघाचे नेतृत्व कर्णधार आश्विनी कोमन हिने केले. यशस्वी खेळाडूंचे क्रीडा शिक्षक प्रा.डॉ.बाळासाहेब धोंडे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आ. भीमराव धोंडे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्रा. डॉ. भाऊसाहेब काळे आदींनी कौतूक केले. यासंघात शेख आफरीन, रुपाली नागरगोजे, सुषमा संकुडे, भारती वाल्हेकर, सुशीला संकुडे, दीपाली काजळे, उषा लगड, स्वाती सपुत्रे, प्राजक्ता अनारसे यांचा समावेश होता.



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत विद्यापीठात अव्वल ठरलेला आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा संघ.

The team to be Anandrao Dhonde Mahavidyalaya in the Women Kabaddi tournament was the first in the university Level

**मराठवाडा साथी**

# कडा येथे लावास चॅम्पियन क्रिकेट ट्रॉफी स्पर्धेत बोडखे,खाडे,खकाळ,खेडकर,साळवे,बहिर यांची उत्कृष्ट कामगिरी



**आष्टी/प्रतिनिधी**

लावास ल्युब स्पेशालिटीज ओनर उद्योजक रतन खारोल यांच्या मार्गदर्शनाखाली कडा येथील आनंदराव धोंडे क्रिकेट कॅडमीच्या मैदानावर भरवण्यात आलेल्या बारा वर्ष वयोगटा खालील आणि १४ वर्षे वयोगटा खालील लावास चॅम्पियन्स ट्रॉफी मध्ये १४ वर्षाखालील वयोगटात आदित्य बोडखे हा उत्कृष्ट फलंदाज ठरला त्याने तीन मॅच मध्ये १३६ ...(पान ४ वर)

धावा बनविल्या तसेच १४ वर्ष वयोगटातील आर्यन खाडे हा उत्कृष्ट गोलंदाज ठरला त्याने तीन मॅच मध्ये १० गडी बाद केले तसेच १४ वर्षे वयोगटातील उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अभय खकाळ हा ठरला त्याने तीन मॅचमध्ये पाच उत्कृष्ट झेल घेतले तसेच १४ वर्षे वयोगटातील क्रिश साळवे हा उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू ठरला त्याने तीन मॅच मध्ये ५६ धावा बनवल्या आणि चार गडी बाद केले १४ वर्षे वयोगट या खालील खेळाडूंचे सामने तीस षटकांचे होते बारा वर्षे वयोगटात खालील सामन्यात उत्कृष्ट फलंदाज रुद्र बहिर आठ ठरला त्याने तीन सामन्यात ६४ रन्स केले तसेच बारा वर्षाखालील वयोगटात उत्कृष्ट गोलंदाज कार्तिक खेडकर हा ठरला त्याने तीन सामन्यात १५ विकेट्स घेतल्या तसेच बारा वर्षाखालील वयोगटात उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू बल्लाळ खेडकर ठरला त्याने तीन सामन्यात ८६ धावा बनवल्या व

Bodkhe, Khade, Khakal, khedkar, Salve and Bahir excellence in the Lavas Cricket Champion Trophy at Kada



# तीन खेळाडूंची राज्यस्तरीय यंगस्टार क्रिकेट लिगसाठी निवड

कडा ( वार्ताहर ):- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या क्रिकेट अॅकॅडमीचे तीन खेळाडूंची राज्यस्तरीय यंगस्टार क्रिकेट लिगसाठी निवड झाली आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात क्रिकेट अॅकॅडमी सुरू आहे. यामध्ये ४० खेळाडू खेळत आहेत. प्रशिक्षक प्रविण चाटे हे सर्व खेळाडूंना प्रशिक्षण देत आहेत. देशातील २३ राज्यातील विविध मैदानावर यंगस्टारच्या ट्रायल घेण्यात आल्या. १४,१६,१९ व २३ या वयोगटातील खेळाडूंचा निवड प्रक्रियेत समावेश आहे. आनंदराव धोंडे क्रिकेट अॅकॅडमी मधुन १४ वर्षे वयोगटातुन विश्वजित राजेंद्र क्षिरसागर व १९ वर्षे वयोगटातील नितेश जगताप या दोघांची राज्यस्तरीय यंगस्टार क्रिकेट लिगसाठी निवड झाली आहे. नवि मुंबई येथे ट्रायल घेण्यात आली. दोघा खेळाडूंची संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार भिमसेन धोंडे, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ हरिदास विधाते, क्रीडा शिक्षक प्रा. बाळासाहेब धोंडे, प्रा. भाऊसाहेब काळे, प्रा.सांडू भगत, प्रा. मुश्ताक पानसरे, प्रशिक्षक प्रविण चाटे व इतरांनी अभिनंदन केले आहे.

महाराष्ट्र
नगर परिष
ई निविदा सुचना क्रमांक : न

A three Player Selected at State level Young Star Cricket League

# Sports News Paper Cutting

## Academic Year: 2018-2019

# २० की.मी. चालणे स्पर्धेत अनिल हाके विद्यापीठात प्रथम



कडा, दि.८(प्रतिनिधी):- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा अनिल किसन हाके हा विद्यार्थी २० की.मी . चालण्याच्या स्पर्धेत विद्यापीठात प्रथम आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन चालण्याच्या स्पर्धा विद्यापीठात संपन्न झाल्या. यामध्ये कडा सारख्या ग्रामीण भागातील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा बी.ए. प्रथम वर्गात शिक्षण घेणारा अनिल हाकेयाने विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवित सुवर्ण पदक पटकावले. अनिल हाकेयाने आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत नावलौकिक केल्याबद्दल संस्थाध्यक्ष आमदार भीमराव धोंडे, प्राचार्य डॉ हरीदास विधाते, क्रिडाप्रमुख प्रा डॉ बाळासाहेब धोंडे, प्रा डॉ भाऊसाहेब काळे, प्रा डॉ सांडु भगत, प्रा डॉ मुश्ताक पानसरे व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

Anil Hake First in the 20 Km. walking competition in the university

प्रजापत्र

चळवळीला वाहिलेले दैनिक

# प्रमोद चौधरी यांची महाराष्ट्र केसरी संघात निवड

कडा दि.१४ (वार्ताहर):

आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथील पै.प्रमोद चौधरी याची ९७ किलो वजन गटात, बीड जिल्हा महाराष्ट्र केसरी संघात निवड झाली आहे.

पुढील महिन्यात नागपुर येथे महाराष्ट्र केसरी स्पर्धा होणार आहेत. यासाठी बीड जिल्हा कुस्ती संघाची परळी तालुक्यातील तळेगाव येथे निवड झाली, यामध्ये आष्टी तालुक्यातील कडा येथीलआनंदराव धोंडे महाविद्यालयाचा एम.ए. चा विद्यार्थी प्रमोद ज्ञानदेव चौधरी याची माती विभागातील ९७ किलो वजन गटात निवड झाली आहे, गेल्या काही वर्षापासुन प्रमोद चौधरी आष्टी येथील बाबाजी तालीमीमध्ये महाराष्ट्र केसरी सईद चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचे धडे घेत आहे. प्रमोद चौधरी याच्या निवडीबद्दल आ.भीमराव धोंडे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, बाळासाहेब आवारे, प्राचार्य डॉ.हरिदास विधाते, प्रा.बाळासाहेब धोंडे, प्रा.भाऊसाहेब काळे यांच्यासह इतर शिक्षकांनी आणि टाकळी येथील ग्रमास्थांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

Pramod Chaudhary selected in Maharashtra Kesari team

# आजपासुन कडा येथे आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा

कडा ,दि.२९(प्रतिनिधी):-कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयामध्ये विद्यापीठ पातळीवरील बी झोनच्या आतंरमहाविद्यालयीन पुरूष कबड्डी स्पर्धा मंगळवार पासुन होणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांनी दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहेत. स्पर्धेचे उद्घाटन आ.भीमराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाचे क्रिडा संचालक डॉ.प्रदीप दुबे यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता प्रा.डॉ.एम.एस.शेख, प्रा.डॉ.आप्पासाहेब हुंबे यांची प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थिती राहणार आहे. स्पर्धेच्या समारोप व बक्षीस वितरण समारंभ ३१ ऑगस्ट रोजी होणार आहे. प्रो कबड्डीमुळे या खेळाला महत्त्व प्राप्त झाले आहे. आष्टी तालुक्यातील क्रिडा रसिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन संयोजक प्राचार्य डॉ.हरिदास विधाते, उपप्राचार्य भगवान वाघुले, प्रा.भाऊसाहेब काळे, प्रा.डॉ.बाळासाहेब धोंडे, प्रा.डॉ.एस.बी.भगत, प्रा.डॉ.मुश्ताक पानसरे यांनी केले.

Inter College Kabaddi Tournament at Kada from today

# खेळात हार-जीत महत्वाची नाही तर खेळ महत्वाचा-प्रा.दुबे

कडा (प्रतिनिधी):- खेळामुळे सर्वांगीण विकास होतो , हार- जित महत्वाची नाही तर खेळ महत्वाचा असल्याचे मत डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्राचार्य डॉ प्रदिप दुबे यांनी कडा येथे केले .
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतरमहाविद्यालयीन बी झोन कबड्डी स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षपदी प्राचार्य डॉ हरिदास विधाते होते , प्रमुख पाहुणे म्हणुन महाराष्ट्र केसरी सईद चाऊस , प्रा डॉ आप्पासाहेब हुंबे , प्रा डॉ मचाले , प्रा गपाट, माजी उपसरपंच राजु कर्डिले , सुनिल मेहेत्रे , आबासाहेब कर्डिले व इतर उपस्थित होते .

प्रारंभी विद्यापीठाच्या ध्वजाचे ध्वजारोहण प्राचार्य डॉ दुबे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्‌घाटनपर भाषणात डॉ दुबे यांनी सांगितले की , आष्टी तालुका मर्दानी खेळाचा तालुका आहे. कबड्डी खेळ जागतिक पातळीवर गेलेला आहे , हे सर्व श्रेय खेळाडुंचे आहे . या ग्रामीण खेळाला महत्व प्राप्त झाले आहे. सहज खेळता येणारा व खर्च नसलेला खेळ आहे , कबड्डीमध्ये यश संपादन करण्यासाठी खेळाडुमध्ये चपळता आवश्यक आहे, खेड्यापाड्यातील गोरगरिबांचा खेळ आहे, माणसे जोडणारा खेळ आहे, खेळामुळे युवकांचे व्यक्तिमत्व घडवुन, सर्वांगीण विकासाला चालना मिळते .महाराष्ट्र केसरी सईद चाऊस यांनी सांगितले की , खेळाडुंनी उत्कृष्ठ खेळ करीत

पान २ वर



## खेळात हार-जीत महत्वाची नाही

आपल्या महाविद्यालयाचे , गावांचे , जिल्ह्याचे व देशाचे नांव उज्वल करावे. जिद्द व चिकाटी ठेवा यश निश्चित मिळते कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरुन बोलताना प्राचार्य डॉ हरिदास विधाते यांनी सांगितले की, खेळाला अनन्य साधारण महत्व आहे , विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम घेवुन आई वडिलांचे तसेच महाविद्यालयाचे नावलौकिक करावे. प्रास्ताविक प्रा डॉ बाळासाहेब धोंडे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा डॉ नवनाथ चौधरी यांनी केले.याप्रसंगी संघ व्यावस्थापक प्रा संजय कदम , प्रो डॉ सुनिल पंढरे ;प्रा भाऊसाहेब काळे , प्रा डॉ सांडु भगत , प्रा डॉ नामदेव विधाते , प्रा डॉ सुभाष नागरगोजे , प्रा चाऊस , प्रा सोनकाटे , प्रो टेकाडे , प्रा मेंगडे , प्रा डॉ सानप , प्रा जमीर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्रा डॉ दत्तात्रय बोडखे यांनी पीएच डी मिळविल्याबद्दल त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. स्पर्धेसाठी २५ संघ सहभागी झाले होते .उपस्थिताचे आभार प्रा डॉ मुश्ताक पानसरे यांनी मानले .

Principal Dubey, It's not about winning or losing in sports, it's about sports

# Sports News Paper Cutting

## Academic Year: 2019-2020

लोकप्रश्न

## हार-जित महत्वाची नाही तर खेळ महत्वाचा-प्राचार्य दुबे



कडा । वार्ताहर

खेळामुळे सर्वांगीण विकास होतो. हार-जित महत्वाची नाही तर खेळ महत्वाचा असल्याचे मत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक प्राचार्य डॉ.प्रदिप दुबे यांनी कडा येथे केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतरमहाविद्यालयीन बी झोन कबड्डी स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अध्यक्षपदी प्राचार्य डॉ हरिदास विधाते होते. प्रमुख पाहुणे म्हणुन महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, प्रा.डॉ.आप्पासाहेब

पान २ वर ▶▶

### हार-जित महत्वाची नाही तर खेळ महत्वाचा-प्राचार्य दुबे

हुंबे, प्रा.डॉ मचाले, प्रा.गपाट, माजी उपसरपंच राजु कर्डिले, सुनिल मेहेत्रे, आबासाहेब कर्डिले व इतर उपस्थित होते. प्रारंभी विद्यापीठाच्या ध्वजाचे ध्वजारोहण प्राचार्य डॉ.दुबे यांच्या हस्ते करण्यांत आले. डॉ.दुबे म्हणाले की,कबड्डीमध्ये यश संपादन करण्यासाठी खेळाडुमध्ये चपळता आवश्यक आहे, खेड्या-पाड्यातील गोरगरिबांचा खेळ आहे, माणसे जोडणारा खेळ आहे, खेळामुळे युवकांचे व्यक्तिमत्व घडवुन, सर्वांगीण विकासाला चालना मिळते. महाराष्ट्र केसरी सईद चाऊस म्हणाले, खेळाडुंनी [illegible] खेळ करीत आपल्या महाविद्यालयाचे, गावांचे, जिल्ह्याचे व देशाचे नांव उज्वल करावे. जिद्द व चिकाटी ठेवा यश निश्चित मिळते. अध्यक्ष पदावरुन बोलताना प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांनी सांगितले की, खेळाला अनन्यसाधारण महत्व आहे. प्रास्ताविक प्रा.डॉ.बाळासाहेब धोंडे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.डॉ.नवनाथ चौधरी यांनी केले. याप्रसंगी संघ व्यवस्थापक प्रा.संजय कदम, प्रा.डॉ.सुनिल पंढरे, प्रा.भाऊसाहेब काळे, प्रा.डॉ.सांडु भगत; प्रा.डॉ.नामदेव विधाते, प्रा.डॉ.सुभाष नागरगोजे, प्रा.चाऊस, प्रा.सोनकाटे, प्रा.टेकाडे, प्रा.मेंगडे, प्रा.डॉ.सानप, प्रा.जमीर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

Principal Dubey, It's not about winning or losing in sports, it's about sports

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com
ना वर्ष ७७ वे । आवृत्ती वर्ष १० । मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, गोवा येथे

## कोमल इंगळे हिची निवड

**कडा :** आनंदराव धोंडे महाविद्यालयातील कोमल इंगळे हिची १९ वर्षे वयोगटातून विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली. अंबाजोगाई येथे जिल्हास्तरीय स्पधा नुकत्याच संपन्न झाल्या. विभागीय स्पर्धा हिंगोली येथे होणार आहेत. या यशाबद्दल आ. भिमराव धोंडे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्रा.बाळासाहेब धोंडे, प्रा. मुश्ताक पानदरे, प्रा.बी.जी. काळे, प्रा. भगत, सुनिल इंगळे, बापू तोटे आदींनी तिचे अभिनंदन केले आहे.

Selection of Komal Ingale of Anandrao Dhonde College from 19 years age group for regional wrestling tournament

www.pudhari.com

पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

वर्ष ७४ वे | आवृत्ती वर्ष ७ | मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, गोवा

## ज्योती झांजे तिसरी

**कडा :** येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाची ज्योती झांजे हिने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला. डॉ. आंबेडकर विद्यापीठात आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत झांजे हिने हे यश मिळविले. या यशाबद्दल तिचे संस्थेचे अध्यक्ष माजी आ. भीमराव धोंडे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्रा. बाळासाहेब धोंडे, प्रा. भाऊसाहेब काळे, प्रा. सांडू भगत, प्रा. डॉ. मुश्ताक पानसरे यांनी अभिनंदन केले.

Jyoti Zanje of Anandrao Dhonde College won the third position in the 100 meter race

# Sports News Paper Cutting

## Academic Year: 2020-2021



Olympic athlete Avinash Sable made Ashti famous in the country
-Former MLA Bhimsen Dhonde



## ऑलिम्पिक खेळाडु अविनाश साबळे याने आष्टीचा देशात नावलौकिक केला–माजी आ.भीमसेन धोंडे

आष्टी दि.२८(प्रतिनिधी) अविनाश हा ऑलिम्पिक स्पर्धेत जीव तोडुन धावला परंतु आलिम्पिक स्पर्धेवेळी कोरोनाने अशक्तपणा आला होता म्हणुन पदक जिंकु शकला नाही. आपण आलिम्पिकमधुन पदक आणणाऱ्या आमच्या शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थीसाठी मोठे बक्षीसही जाहिर केलेले आहे. ते बक्षीस अविनाश साबळे याने पटकावे. आष्टी तालुक्यातील मांडवा येथील अविनाश साबळे हा जवान टोकियो



ऑलिम्पिक थलेटिक्स स्पर्धेत सहभागी झाला होता. भारताचे प्रतिनिधित्व केलेले आहे. ऑलिम्पिकमध्ये पदक हुकले आहे परंतु ऑलिम्पिक खेळाडु अविनाश साबळे याने आष्टीचा देशात नावलौकिक केला असल्याचे प्रतिपादन शेतकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजपनेते माजी आ.भीमसेन ▸▸ पान २ वर





संकेत

Sunday 2021/02/14



कडा - प्रहार करिअर अकॅडमी व आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय कडा यांच्या विद्यमाने आयोजित पोलीस, आर्मी व संरक्षण दलातील विविध भरती बाबत मार्गदर्शन कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा.आ.भीमराव धोंडे, यावेळी व्यासपीठावर युवा नेते अभयराजे धोंडे, प्रहार करिअर अकॅडमी अहमदनगरचे संचालक विनोदसिंग परदेशी, प्रवक्ता तथा कार्यशाळा विभाग प्रमुख गणेश रणसिंग, प्राचार्य डॉ.हरिदास विधाते इत्यादी.

Prahar Career Academy and Anandrao Dhonde Alias Babaji College, Kada jointly organized a guidance workshop on various recruitments in Police, Army and Defence forces.

पुण्य नगरी

रघुनाथ कर्डीले, आष्टी तालुका प्रतिनिधी

# अविनाश साबळेचा कडा येथे सत्कार

आष्टी / प्रतिनिधी : तालुक्यातील कडा येथील आनंद चॅरिटेबल संस्थेचे आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्राचा विद्यार्थी ऑलिम्पिकवीर तथा ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होऊन चांगली कामगिरी केलेला अविनाश मुकुंद साबळे (रा.मांडवा - बेलगाव) याच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.



अविनाश साबळे हा जपान देशातील (टोकीयो) ऑलिंपिक स्पर्धा २०२० मधील स्टीपलचेस (अॅथलेटिक्स) प्रकारामध्ये त्याने चांगली कामगिरी केल्याबद्दल कडा येथे आनंदराव धोंडे महाविद्यालयात शनिवार दि.२८ ऑगस्ट २०२१ रोजी महाविद्यालयाच्यावतीने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.भीमसेन धोंडे यांच्या हस्ते सकाळी ११ वा.जाहिर सत्कार होणार आहे अशी माहिती आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्राचार्य तथा केंद्र प्रमुख डॉ.हरिदास विधाते आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र संयोजक डॉ.अशोक माळशिखरे यांनी दिली.

Smart Beed -
Page No.3 August 28, 2021

Avinash Sable felicitated at kada

# ऑलिम्पिक खेळाडू अविनाश साबळेंचा माजी आ.भीमसेन धोंडे यांचे हस्ते सत्कार संपन्न



आष्टी (प्रतिनिधी)

तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालयामध्ये ऑलिंपिक खेळाडू अविनाश मुकुंद साबळे यांचा नुकताच सत्कार संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी.आ.भीमसेन धोंडे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून बीड जिल्हा सहचिटणीस शंकर देशमुख, अविनाश साबळेंचे वडील मुकुंद साबळे होते. सर्वप्रथम प्रेरणास्थान स्व.आनंदराव धोंडे उर्फ बाबाजींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांनी म्हटले की,आष्टी तालुक्यात खेळाडू व खेळाडूंची उज्ज्वल परंपरा आहे. आमचे आधारस्तंभ माजी.आ.भीमसेन धोंडे साहेब हे ही त्यांच्या महाविद्यालयीन जीवनात कुस्ती व कबड्डीचे उत्कृष्ट खेळाडू होते. त्यामुळे त्यांचे खेळाडूंवर विशेष प्रेम आहे. खेळाडू विषयी त्यांना जाणिव आहे. अविनाश मुकुंद साबळे हा आमचे महाविद्यालयाच्या परंपरेचे [illegible] महाराष्ट्र मुक करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. कडा आष्टी परिसरात असे गुणी खेळाडू घडावे तसेच साबळेंचे कौतुक करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.त्यानंतर ऑलिंपिक खेळाडू अविनाश साबळे यांचा शाल, स्मृतिचिन्ह, रोख रक्कम पंचवीस हजार रुपये व फेटा बांधून मा.आ.भीमसेन धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देतांना अविनाश साबळे यांनी म्हटले की, ऑलिंपिक स्पर्धेनंतर आष्टी तालुक्यात माझ्या संस्थेकडून व आदरणीय माजी.आ.धोंडे यांनी माझा सत्कार केला याचा मनस्वी आनंद मला होत आहे. आजच्या शैक्षणिक पद्धतीमध्ये खेळाला गौण स्थान आहे. जर खेळाला दुय्यम दर्जा न देता प्रोत्साहन दिले तर ग्रामीण भागातील अनेक खेळाडू तयार होतील. आज शाळेमधील खेळाचा तास म्हणजे हसी मजाक करण्यासाठी असतो, खेळाकडे गंभीर दृष्टीने पाहिले जात नाही. जर वैयक्तिक खेळाकडे विद्यार्थ्यांनी लक्ष दिले तर ऑलिंपिकचे एक काय अनेक पदके आपल्या देशाला मिळू शकतात. मी माझ्या खेळाचा सराव आणखी थांबवलेला नाही. २०२४ मध्ये पॅरिस येथे होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवण्यासाठी मी [illegible] मनोगत व्यक्त करतांना माजी.आ.भीमसेन धोंडे यांनी म्हटले की, आपल्या आष्टी तालुक्यातील मांडवा बेलगाव सारख्या खेड्यात जन्म घेऊन अविनाश साबळे यांनी ऑलिंपिक स्पर्धेत स्टीपलचेस खेळामध्ये सातवा क्रमांक मिळवला आहे. ही मोठी कौतुकास्पद व अभिमानाची बाब आहे. टोकियो येथील स्पर्धेत यश जरी मिळाले नाही तरी २०२४ मध्ये पॅरिस येथे होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेत नक्कीच मेडल मिळेल अशी अपेक्षा आहे. त्यासाठी अविनाशने भरपूर सराव करावा. आज त्यांना आम्ही प्रोत्साहन पर काही रोख रक्कम दिली आहे. भविष्यात अधिकची रक्कमही देणार आहे. आजच्या तरुणांनी सांघिक खेळाकडे जास्त लक्ष न देता वैयक्तिक खेळाचा सराव करावा. वैयक्तिक खेळामध्ये तरुण पुढे जाऊ शकतात, त्यासाठी मेहनत, चिकाटी व जिद्द असणे गरजेचे आहे असे माजी.आ.धोंडे यांनी म्हटले. याप्रसंगी शंकर देशमुख यांचे समयोचित भाषण झाले. प्रा.भास्कर [illegible] यांनी अविनाश साबळे यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. बी.एस. खैरे यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.मुस्ताक

Olympic Athlete Avinath Sable was felicitated by former MLA Bhimsen Dhonde



Sun 29-08-2021
Page No. 2

# ऑलिम्पिक खेळाडू अविनाश साबळेंचा माजी आ. भीमसेन धोंडे यांच्या हस्ते सत्कार संपन्न

Olympic Athlete Avinash Sable was felicitated by former MLA Bhimsen Dhonde

# Sports News Paper Cutting

## Academic Year: 2021-2022

रिपोर्टर

Wednesday 20-10-2021 रिपोर्टर - अक्षय विधाते

# शेख साहीलची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड




आष्टी ( रिपोर्टर ) :- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा एम.एस्सी.या वर्गातील विद्यार्थी साहिल राज शेख याने औरंगाबाद येथे झालेल्या पावर लिफ्टींग स्पर्धेत यश संपादन केले आहे.त्यामुळे लवकरच गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.साहिलच्या यशाबद्दल महाविद्यालयात प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.याबाबत अधिक माहिती अशी की,आष्टी तालुक्यातील धानोरा येथील डॉ.राज शेख यांचा मुलगा साहिल हा वेट लिफ्टींग मध्ये करिअर करीत आहे.महाराष्ट्र राज्य पावर लिफ्टींग असोसिएशनने औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत साहिल शेख याने १०५ किलो वजन गटातुन खेळताना २०५ किलो वजन उचलुन यश संपादन करीत राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.महाविद्यालयात झालेल्या साहिलच्या सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व प्राचार्य डॉ.हरिदास विधाते हे होते.यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य बापु खैरे,उपप्राचार्य एस.एन.वाघुले,प्रा.बाळासाहेब धोंडे,प्रा.भाऊसाहेब काळे,प्रा.सांडु भगत,प्रा.मुश्ताक पानसरे हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांनी सांगितले की,साहिलचे पावर लिफ्टींगमधील यश हे कौतुकास्पद आहे.संस्थाध्यक्ष माजी आमदार भिमराव धोंडे हे स्वत: खेळाडू आहेत.संस्थेच्या विविध शाळा महाविद्यालयातील खेळाडूंना ते नेहमीच प्रोत्साहन देण्याचे काम करतात.धानोरा गावासारख्या छोट्या गावातील साहील राज शेख यांच्या उत्कृष्ट खेळामुळे भविष्यात आपल्या महाविद्यालयाचे, गांवाचे,जिल्ह्याचे आणि राज्याचे नाव निश्चित उज्वल होईल असा विश्वास प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.बाळासाहेब धोंडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.मुश्ताक पानसरे यांनी मानले.आनंदराव धोंडे महाविद्यालयाने साहिलचा सत्कार करुन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकुन मनोधैर्य वाढविण्याचे काम केले त्याबद्दल त्याचे वडील डॉ.राज शेख यांनी महाविद्यालयास धन्यवाद दिले.

Weightlifter Shaikh Sahil selected for national competition

झुंजार नेता
Mon 22-11-2021
Page No. 8

# पावर वेटलिफ्टींगच्या स्पर्धेत सिल्वर पदक मिळवत साहिल देशात दुसरा

कडा दि.२१(प्रतिनिधी) :- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा विद्यार्थी साहिल राजू शेख याने शुक्रवार दिनांक १९ नोव्हेंबर २०२१ रोजी गोवा येथे पार पडलेल्या राष्ट्रीय पावर वेटलिफ्टींगच्या चॅम्पियनशिप स्पर्धेत सिल्वर पदक मिळवत देशात दुसरा क्रमांक पटकावला.

याबाबत अधिक माहिती अशी आष्टी तालुक्यातील धानोरा येथील डॉ राज शेख यांचा मुलगा साहिल याने २०१८ मध्ये खेळायला सुरवात केली. प्रारंभी त्याला या खेळाची काहीच माहिती नव्हती, हळूहळू माहिती होत गेली. जिद्द व मेहनतीने तीन वर्षात साहिलने राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले. साहिल शेख हा धानोरा येथील डॉ. राज शेख यांचा मुलगा आहे. गेल्या तीन वर्षात खेळताना साहिलने एकुण १४ पदके मिळवली. यामधे औरंगाबाद येथे पार पडलेल्या स्पर्धेत तीन व महाराष्ट्र चॅम्पियनशिपमध्ये ६ गोल्ड मेडल



आणि ३ सिल्वर मेडल मिळवले. तसेच राष्ट्रीय स्पर्धेत १ सिल्वर मेडल आणि १ ब्रॉंझ मेडल मिळवले. साहिलने धानोरा सारख्या खेड्या गावातून एक उंच भरारी घेत राष्ट्रीय पातळीपर्यंत यश संपादन करीत महाविद्यालयाचे, गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे व महाराष्ट्राचे नावलोकिक केले. साहिलच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार भिमराव धोंडे, प्राचार्य डॉ हरिदास विधाते व धानोरा ग्रामस्थांनी अभिनंदन

Sahil was second in the country to beg a silver medal in the power weight-lifting competition

महंत खमाणीकर बाबा महानुभाव, आचार्य महंत पंथाने केला असल्याच

# कबड्डीपटू प्रेम खुरंगे याचा महाविद्यालयात सत्कार

कडा दि.२० (प्रतिनिधी) राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणाऱ्या अहमदनगर जिल्हा संघात उत्कृष्ट खेळी केल्याबद्दल महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रेम खुरंगे याचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी की, ठाणे येथे ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत अहमदनगरच्या संघाने २२ वर्षानंतर सुवर्णपदक पटकावले. अहमदनगर जिल्हा संघात कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा बी एस्सी द्वितीय वर्षाचा खेळाडू प्रेम खुरंगे याने उत्कृष्ट खेळी केली.

अहमदनगर संघाने मुंबईच्या बलाढ्य संघाबरोबर प्रथमपासून आक्रमकपणे खेळ करून सुवर्णपदक पटकावले. प्रेम खुरंगे याचे यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कबड्डी संघात निवड झाली होती. त्याबद्दल त्याचा संस्थाध्यक्ष माजी आमदार भिमराव धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला होता. अहमदनगर जिल्हा संघाकडून उत्कृष्ट खेळी केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. हरिदास विधाते यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. बापु खैरे, डॉ. एस एन वाघुले, प्रा. बाळासाहेब धोंडे, प्रा. भाऊसाहेब काळे, प्रा. डॉ. सांडू भगत व इतर उपस्थित होते.



Kabaddi player Prem Khurange felicitated in the college

# कबड्डीपटू प्रेम खुरंगे यांचा सत्कार



प्रतिनिधी । कडा

दि.१९ : येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रेम खुरंगे याने राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणाऱ्या अहमदनगर जिल्हा संघात उत्कृष्ट खेळी केली आहे. याबद्दल त्याचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

ठाणे येथे ६९ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत अहमदनगरच्या संघाने २२ वर्षानंतर सुवर्णपदक पटकावले. अहमदनगर जिल्हा संघात कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा बी. एस्सी. द्वितीय वर्षाचा खेळाडू प्रेम खुरंगे याने उत्कृष्ट खेळी केली. संघाने मुंबईच्या बलाढ्य संघाबरोबर प्रथमपासून आक्रमकपणे खेळ करून सुवर्णपदक पटकावले. प्रेम खुरंगे याचे यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कबड्डी संघात निवड झाली होती. त्याबद्दल त्याचा माजी आ. भिमराव धोंडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला होता. उत्कृष्ट खेळी केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. हरिदास विधाते यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. बापु खैरे, डॉ. एस. एन. वाघुले, प्रा. बाळासाहेब धोंडे, प्रा. भाऊसाहेब काळे, प्रा. डॉ. सांडू भगत व इतर उपस्थित होते.

Kabaddi player Prem Khurange felicitated in the college

**सकाळ**

निसार शेख(बातमीदार आष्टी)

# शेख साहिलची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



**शेख साहिल**

**आष्टी :** तालुक्यातील धानोरा येथील शेख साहील राज याने औरंगाबाद येथे झालेल्या पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत यश संपादन केले असून गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.

आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा विद्यार्थी साहील राज शेख याने महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टिंग असोसिएशनने औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत १०५ किलो वजनी गटातून खेळताना २०५ किलो वजन उचलून यश संपादन केले. महाविद्यालयाच्या वतीने साहीलचा सत्कार प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांनी केला. यावेळी उपप्राचार्य बापू खैरे, उपप्राचार्य एस.एन. वाघुले, प्रा.बाळासाहेब धोंडे, प्रा. भाऊसाहेब काळे, प्रा.सांडु भगत, प्रा.मुश्ताक पानसरे आदी उपस्थित होते.

Weightlifter Shaikh Sahil selected for national competition

# मराठवाडा साथी

## कडा येथे लावास चॅम्पियन क्रिकेट ट्रॉफी स्पर्धेत बोडखे, खाडे, खकाळ, खेडकर, साळवे, बहिर यांची उत्कृष्ट कामगिरी



**आष्टी/प्रतिनिधी**

लावास ल्युब स्पेशालिटीज ओनर उद्योजक रतन खारोल यांच्या मार्गदर्शनाखाली कडा येथील आनंदराव धोंडे क्रिकेट कॅडमीच्या मैदानावर भरवण्यात आलेल्या बारा वर्ष वयोगटा खालील आणि १४ वर्षे वयोगटा खालील लावास चॅम्पियन्स ट्रॉफी मध्ये १४ वर्षाखालील वयोगटात आदित्य बोडखे हा उत्कृष्ट फलंदाज ठरला त्याने तीन मॅच मध्ये १३६ ...(पान ४ वर)

धावा बनविल्या तसेच १४ वर्ष वयोगटातील आर्यन खाडे हा उत्कृष्ट गोलंदाज ठरला त्याने तीन मॅच मध्ये १० गडी बाद केले तसेच १४ वर्षे वयोगटातील उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अभय खकाळ हा ठरला त्याने तीन मॅचमध्ये पाच उत्कृष्ट झेल घेतले तसेच १४ वर्षे वयोगटातील क्रिश साळवे हा उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू ठरला त्याने तीन मॅच मध्ये ५६ धावा बनवल्या आणि चार गडी बाद केले १४ वर्षे वयोगट या खालील खेळाडूंचे सामने तीस षटकांचे होते बारा वर्षे वयोगटात खालील सामन्यात उत्कृष्ट फलंदाज रुद्र बहिर आठ ठरला त्याने तीन सामन्यात ६४ रन्स केले तसेच बारा वर्षाखालील वयोगटात उत्कृष्ट गोलंदाज कार्तिक खेडकर हा ठरला त्याने तीन सामन्यात १५ विकेट्स घेतल्या तसेच बारा वर्षाखालील वयोगटात उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू बल्लाळ खेडकर ठरला त्याने तीन सामन्यात ८६ धावा बनवल्या व

Bodkhe, Khade, Khakal, khedkar, Salve and Bahir excellence in the Lavas Cricket Champion Trophy at Kada

# ठाणे येथे पार पडलेल्या पावरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत साहिलला सुवर्णपदक

कडा, दि.७ (प्रतिनिधी):- आष्टी तालुक्यातील धानोरा येथील साहिल शेख यास ठाणे येथे पार पडलेल्या पावरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत सुवर्णपदक मिळाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा एम. एस्सी. या वर्गातील विद्यार्थी साहिल राज शेख याने यापुर्वी औरंगाबाद येथे झालेल्या पावर लिफ्टींग स्पर्धेत यश संपादन केले होते. त्यामुळे लवकरच गोवा येथे होणार्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे.धानोरा येथील डॉ. राज शेख यांचा मुलगा साहिल हा वेट लिफ्टींग मध्ये करिअर करीत आहे.

साहिलने यावर्षी बीड जिल्ह्याला ३ सुवर्णपदक मिळवुन दिले. तीन दिवसापूर्वी ठाणे येथे महाराष्ट्रा राज्य पावरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धा संपन्न झाली. साहिलने १०५ किलो वजन गटात सुवर्णपदक प्राप्त केले. गेल्या महिन्यात बेंचप्रेस स्पर्धेत २ सुवर्णपदक प्राप्त केले होते. या वर्षी साहिलने उत्कृष्ट कामगिरी करत ३ सुवर्णपदक प्राप्त केले व महाराष्ट्र चॅम्पियन झाला आहे. पुढील महिन्यात राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धा गोवा येथे होणार आहे.जानेवारी महिन्यात राष्ट्रीय पावरलिफ्टिंग स्पर्धा राजस्थान येथे आहे. पुढच्या दोन्ही स्पर्धेत साहिल चांगली कामगिरी करील असा विश्वास प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी व्यक्त केला. साहिलच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार भिमराव धोंडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व प्राचार्य डॉ. हरिदास विधाते व इतरांनी अभिनंदन केले आहे.

Sahil won Gold Medal in Power Lifting Championship held at Thane

पप्पू बजगुड यानींही या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# धोंडे महाविद्यालयाचा खेळाडू विद्यापीठात द्वितीय

कडा दि.२१ ( वार्ताहर ):- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचा खेळाडू आकाश अशोक घोडक्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. नुकत्याच मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर येथे आंतरमहाविद्यालयीन जुडो स्पर्धा संपन्न झाल्या.



यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आकाश अशोक घोडके यांनी विद्यापीठ पातळीवर द्वितीय क्रमांक मिळवला. शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. डॉ. बाळासाहेब धोंडे यांनी खेळाडूस मार्गदर्शन केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे, प्राचार्य डॉ. एच. जी. विधाते, उपप्राचार्य डॉ.बी.एम चव्हाण, उपप्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले, उपप्राचार्य डॉ. बी.एस.खैरे व इतरांनी आकाश घोडक्याचे अभिनंदन केले.

Dhonde college player second in university

**Dr. B. M. Dhonde**
**Director**
Physical Education
& Sports

Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya Kada, Tal. Ashti,

**Dr. H. G. Vidhate**
PRINCIPAL
Anandrao Dhonde Alias Babaji Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed